# पुन्हा एकदा

– प्रतिमा इंगोले

**कवितेची मध्यवर्ती कल्पना :** मरगळलेला समाज जागृत व्हावा, भेदाभेद मिटून जावेत, इथली तरुणाई नवविचारांनी भारून नवीन समाजाची निर्मिती व्हावी, अशा आशादायक स्थितीचे व मनाच्या भावस्थितीचे चित्रण ओजस्वी शब्दांत कवयित्रींनी साकारले आहे.

**The Central theme of the Poem :** The poetess has versified the sentiments of a youth giving a clarion call to rouse social reform and revival of thoughts, to inspire and create a hopeful and positive world.

## शब्दार्थ

**भिनावी** – मिसळून जावी, विरघळून जावी – soaked into, absorbed, penetrated.

**पुकार** – जल्लोष, घोष – a clarion call, proclamation.

**एकवार** – एकदा, एक वेळ – once, at one time.

**पिंगा** – गोल गोल फिरणे – a game played by young girls of spinning or moving their upper body in circular motion.

**बेभान** – भान नसणे, धुंद होणे – to go wild, unrestrained, recklessly.

**भेदाभेद** – फरक – differences, discrimination.

**घुमावा** – गिरक्या घेत सुटावा – be moving in circles.

**युवक** – तरुण – youth.

**भारला जावा** – चांगल्या विचारांचा पगडा, भारित – positively influenced, charged up.

**नवनिर्माण** – नवीन निर्मिती – new reform, evolution, renewal.

**चाहूल** – अंदाज – hint, indication.

**भुलावी** – विसरून जावी – forget, (here) overlook.

**उजळावी** – प्रकाशमय व्हावी – be illuminated, brightened.

**दिगंतात** – अवकाशात – in the sky, in space.

## वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

(१) **रक्तात भिनणे** – (एखादा विचार) रक्तात विरघळणे – deep rooted, firmly embedded.

(२) **पुकार करणे** – घोष करणे – to proclaim, to call out to, to request for action.

(३) **पिंगा घालणे** – गोल गोल फिरणे – to go round and round, to whirl, to move in a circular motion.

(४) **भारले जाणे** – (एखाद्या विचाराने) भारित होणे – to get charged up, to be filled with positive energy.

(५) **चाहूल लागणे** – अंदाज येणे – to sense something, to get a hint of something.

## Paraphrase of the Poem

While penning down the desire to create a society on new principles, the poetess says:

Once again, let the lightning blaze and plunge down to blend into the young blood and kindle the young muscles to proclaim. May this take place once more!

Once again, let showers be reckless and flood the earth. Let the soil beneath the feet blend into the earth. Let new principles shower on us and wash away social discrimination (of caste, creed, race, religion) among the children of mother earth. And unite people once more!

Once again, let the wind of creativeness storm the atmosphere and charge the youth with the urge for new reforms. Let him and her forget hunger and thirst to chase the goal.

Let the land listen to the prophesy of fortune, to greet new generation. Let our motherland India gain supremacy beyond earth. Let there be a new beginning of a world of humanity; illuminating the earth and sky with new principles, once more!!

## कवितेचा भावार्थ

नवविचारांचा समाज निर्माण व्हावा, असा ध्यास घेतलेल्या भावनांचे चित्रण करताना कवयित्री म्हणतात –

पुन्हा एकदा आकाशात वीज लख्ख चमकावी. खाली उतरून ती रक्तात मिसळावी आणि स्नायू पेटून उठावेत. अंगात शक्तीचा संचार होत स्नायूंनी बलशाली घोष करावा. पुन्हा एकदा असे घडावे.

पुन्हा एकदा फेर धरीत, पिंगा घालीत पावसाच्या जोरदार सरी बेभान होऊन खाली कोसळाव्यात. पायाखालची माती मातीत मिसळून जावी. माती माती एक व्हावी. सगळे भेदाभेद मिटून जावेत. (नवीन विचारांच्या सरी कोसळून समाजातील जातिभेद, वर्णभेद, धर्मभेद नष्ट व्हावेत. सारी माणसे एकत्र यावीत.) पुन्हा एक वेळ!!

पुन्हा एकदा नवीन सृजनाचा वारा घुमावा नि इथल्या तरुणांची मने भारली जावीत. तहानभूक विसरून त्यांना नवनिर्मितीची चांगली आश्वासक चाहूल लागावी. नवनिर्मितीच्या तेजोमय प्रकाशात ही इथली भूमी उजळून जावी. तिची दिव्य प्रभा अवकाशात पसरावी. आपली भारतभूमी सर्वत्र आदर्शवत दिसावी. (नवीन विचारांच्या मानवतावादी समाजाची निर्मिती या धरतीवर व्हावी.) पुन्हा एकदा!!

## कृति-स्वाध्याय व उत्तरे

### कृतिपत्रिकेतील प्रश्न २ (अ) साठी...

**प्रश्न. पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

कृती १ : (आकलन)

**(१) आकृती पूर्ण करा :**

कवितेतील घटकांच्या कृती लिहा.

- वीज → ______
- पाऊस → ______
- वारा → ______

*** (२) पुढील घटनांचे कवयित्रीला अपेक्षित परिणाम लिहा :**

| गोष्टी | परिणाम |
|---|---|
| (i) वीज चमकणे. | |
| (ii) वारा घुमणे. | |

पुन्हा एकदा
चमकावी वीज
उतरावी खाली
भिनावी रक्तात
पेटावे स्नायू
करीत पुकार
पुन्हा एकवार

पुन्हा एकदा
घालीत पिंगा
पावसाच्या सरी
व्हाव्यात बेभान
कोसळाव्या खाली
मातीत माती
व्हावी एक...
पुसून टाकीत
भेदाभेद...
पुन्हा एकवेळ...

पुन्हा एकदा
घुमावा वारा
युवक इथला
भारला जावा
भुलावी तहान
विसरावी भूक
नवनिर्माणाची
लागावी चाहूल
उजळावी भूमी...
दिगंतात...
पुन्हा एकदा...

### उत्तरे

(१) कवितेतील घटकांच्या कृती लिहा.

- वीज → वीज चमकून खाली यावी. रक्तात भिनावी.
- पाऊस → पावसाच्या सरी पिंगा घालत बेभान होऊन कोसळाव्यात.
- वारा → वारा घुमावा, तरुणांच्या अंगात शिरावा.

(२)

| गोष्टी | परिणाम |
|---|---|
| (i) वीज चमकणे. | रक्तात भिनून स्नायू पेटावेत. घोष करावा. |
| (ii) वारा घुमणे. | तहानभूक विसरून युवक भारला जावा. त्याला नवनिर्माणाची चाहूल लागावी. |

कृती २ : (आकलन)

*** (१) पुढील प्रतीके व त्यांचा अर्थ यांच्या जोड्या लावा :**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (i) वीज रक्तात भिनावी | (१) सर्वत्र भारतभूमी चमकावी |
| (ii) मातीत माती एक व्हावी | (२) समाजातील भेदभाव नष्ट व्हावे |
| (iii) नवनिर्माणाची चाहूल लागावी | (३) मातीने भेदभाव विसरावा |
| (iv) पुसून टाकीत भेदभाव | (४) माणसांत उत्साह निर्माण व्हावा |
| (v) उजळावी भूमी दिगंतात | (५) नवनवीन गोष्टीची निर्मिती करण्याची इच्छा व्हावी |

*** (२) कवयित्रीला असे का म्हणावेसे वाटते?**

(i) पावसाच्या सरी कोसळाव्यात; कारण ------------------

(ii) भुलावी तहान, विसरावी भूक; कारण ------------------

**(३) चौकटी पूर्ण करा :**

(i) चमकणारी → ______

(ii) कोसळणाऱ्या → ______

(iii) विसरावी अशी →

(iv) भुलावी अशी →

(v) उजळावी अशी →

(vi) एकत्र व्हावी अशी →

## उत्तरे

(१)

(i) वीज रक्तात भिनावी – माणसांत उत्साह निर्माण व्हावा.

(ii) मातीत माती एक व्हावी – मातीने भेदभाव विसरावा.

(iii) नवनिर्माणाची चाहूल लागावी – नवनवीन गोष्टींची निर्मिती करण्याची इच्छा व्हावी.

(iv) पुसून टाकीत भेदभाव – समाजातील भेदभाव नष्ट व्हावेत.

(v) उजळावी भूमी दिगंतात – सर्वत्र भारतभूमी चमकावी.

(२)

(i) पावसाच्या सरी कोसळाव्यात; कारण मातीत माती मिसळून भेदभाव नष्ट व्हावेत.

(ii) भुलावी तहान, विसरावी भूक; कारण इथल्या युवकाला नवनिर्माणाची चाहूल लागावी.

(३)

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | वीज | (ii) | पावसाच्या सरी |
| (iii) | भूक | (iv) | तहान |
| (v) | भूमी | (vi) | मातीत माती |

कृती ३ : (काव्यसौंदर्य)

***(१) 'मातीत माती व्हावी एक, पुसून टाकीत भेदाभेद' या काव्यपंक्तीतील सामाजिक आशय स्पष्ट करा.**

**उत्तर :** आपण सुजलाम सुफलाम अशा भारतभूमीत राहतो. भारतात अनेक धर्म व पंथ एकत्र राहतात. विविधतेत एकता, हे भारताचे वैशिष्ट्य आहे. परंतु कधी कधी वर्णभेद, जातिभेद, धर्मभेद उफाळून वर येतात व दंगली घडतात. असे होऊ नये. मानवतेचा वसा भारतभूमीवर कायम राहावा, म्हणून कवयित्री म्हणतात की बेभान पावसाच्या सरी कोसळाव्यात व मातीत माती मिसळून जावी. सर्व भेदभाव नष्ट व्हावेत. म्हणजे पुन्हा एकदा भारतभूमी आदर्शवत होईल. सर्व जगात मानाने वावरेल.

***(२) आपल्या देशात शांतता निर्माण व्हावी, यासाठी 'पुन्हा एकदा' काय व्हावे असे तुम्हांला वाटते, ते स्वत:च्या शब्दांत लिहा.**

**उत्तर :** आपल्या देशात अजूनही अज्ञान, गरिबी व अंधश्रद्धा यांचा अंधार दाटला आहे. त्यामुळे जातिभेद व धर्मभेद यांची राक्षसीवृत्ती कधी कधी वावरताना दिसते आणि देशातील शांतता भंग पावते. यावर पहिला उपाय म्हणजे भारतात सर्वदूर मूल्यशिक्षणाचा प्रसार होणे अत्यंत आवश्यक आहे. ज्ञानाच्या प्रकाशाने इथला स्वार्थी अंधार नष्ट होईल. तसेच भारतात सर्वत्र शांतता नांदावी म्हणून सर्वधर्मसमभावाचे व्रत प्रत्येकाने अंगिकारले पाहिजे. राष्ट्रीय एकात्मता जेव्हा बळकट होईल तेव्हाच देशात धर्मभेद लयाला जातील व पुन्हा एकदा भारत साऱ्या जगाला शांतीचा संदेश देईल, असे वाटते.

***(३) कवितेचा तुम्हांला समजलेला भावार्थ स्पष्ट करा.**

**उत्तर :** नवीन विचारांचा समाज निर्माण व्हावा असा ध्यास या कवितेतून आर्त व ओजस्वी शब्दांत व्यक्त झाला आहे.

पुन्हा एकदा विजेची शक्ती अंगात संचारावी व नवनिर्मितीचा घोष करावा. पावसाच्या सरी अशा कोसळाव्यात की मातीत माती मिसळून जावी. म्हणजेच सर्वधर्मसमभावाच्या, राष्ट्रीय एकात्मतेच्या पावसात सारे जातिभेद, धर्मभेद नष्ट व्हावेत; अशी इच्छा कवयित्री व्यक्त करताना दिसतात.

नवविचारांचा वारा घुमावा नि त्याने तरुणाईची मने भारून जावीत. नवसमाजरचनेची आश्वासक चाहूल लागावी नि ही मातृभूमी पुन्हा नव्या प्रकाशात उजळावी.

## कवितेवर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती

### कृतिपत्रिकेतील प्रश्न २ (आ) साठी ...

**प्रश्न. पुढील कवितेवर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा :**

**कविता – पुन्हा एकदा.**

**उत्तर : पुन्हा एकदा.**

**(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री** → प्रतिमा इंगोले.

**(२) कवितेचा रचनाप्रकार** → मुक्तछंदातील कविता.

**(३) कवितेचा काव्यसंग्रह** → –

**(४) कवितेचा विषय** → समाजातील भेदाभेद संपून निकोप व आदर्श समाज निर्माण व्हावा.

**(५) कवितेतून व्यक्त होणारा (स्थायी) भाव** → नवविचारांची नव समाजनिर्मिती हा मूल्यभाव व्यक्त झाला आहे.

**(६) कवितेच्या कवींची/कवयित्रींची लेखनवैशिष्ट्ये** → कवितेची भाषा साधी व थेट काळजाला भिडणारी आहे. वीज, पाऊस व वारा अशी तीन प्रतीके वापरून कविता आशयसंपन्न झाली आहे. प्रत्येक कडव्यात एक अंतर्गत शब्दलय साधली आहे.

**(७) कवितेची मध्यवर्ती कल्पना** → परंपरागत रूढी जपणारा समाज जागृत व्हावा. नवविचारांनी भारावा. धर्मभेद, वर्णभेद, जातिभेद मिटून नवनिर्मिती व्हावी, अशी इच्छा कवयित्रींनी प्रकट केली आहे.

**(८) कवितेतून व्यक्त होणारा विचार** → सर्वधर्मसमभाव व राष्ट्रीय एकात्मता या मुल्यांचे रोपण व्हावे. त्यांतून नवीन विचारांनी भारलेला नवीन सकारात्मक समाज निर्माण व्हावा. मानवतावादी विचारांची मुहूर्तमेढ रोवावी, हा विचार या कवितेतून व्यक्त झाला आहे.

(९) कवितेतील आवडलेली ओळ → मातीत माती व्हावी एक.

(१०) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे → माणुसकीचा व धर्मभेदापलीकडच्या समाजाच्या निर्मितीचा विचार जनमानसात रुजवणारी ही कविता मला आवडली. अलीकडच्या काळात समाज मूल्यहीन व एकारलेल्या धर्मांध विचारांचा होऊ पाहतोय. या बुरसटलेल्या विचारांच्या विरोधात तरुणाईने एकत्र व्हायला हवे, हा आशय या कवितेत मांडल्यामुळे ही कविता मला आवडली.

(११) कवितेतून मिळणारा संदेश → सर्वधर्मसमभाव व राष्ट्रीय एकात्मता ही मूल्ये आपण जपायला हवीत व धर्मनिरपेक्षता दृढ व्हायला हवी. नवीन मानवतावादी विचारांचा प्रसार व्हायला हवा.

## रसग्रहण

**कृतिपत्रिकेतील प्रश्न २ (इ) साठी...**

**प्रश्न. पुढील ओळींचे रसग्रहण तुमच्या शब्दांत लिहा :**

**'नवनिर्माणाची लागावी चाहूल**
**उजळावी भूमी... दिगंतात... पुन्हा एकदा...'**

**उत्तर : आशयसौंदर्य :** कवयित्री प्रतिमा इंगोले यांनी 'पुन्हा एकदा' या कवितेमध्ये परंपरागत रूढी जपणारा समाज जागृत होऊन नवविचारांनी भारावा. धर्मभेद, वर्णभेद, जातिभेद मिटून नवनिर्मिती व्हावी. निकोप व आदर्श समाज निर्माण व्हावा, असे आशादायी व विश्वासार्ह चित्र रंगवले आहे. सर्वधर्मसमभाव व राष्ट्रीय एकात्मता ही मूल्ये दृढ करण्यासाठी धर्मनिरपेक्ष नवमानवतावादी विचारांचा प्रसार व्हायला हवा, अशी शिकवण ही कविता देते.

**काव्यसौंदर्य :** या ओळींत पुन्हा एकदा नवनिर्मितीचा ध्यास घ्यावा, असे सूचित करताना कवयित्री म्हणतात की, इथली तरुण पिढी नवविचारांनी जागृत व्हावी. त्यांना नवनिर्मितीची आश्वासक चाहूल लागावी. नवनिर्मितीच्या तेजोमय प्रकाशात इथली भूमी उजळून जावी व तिची दिव्य प्रभा अंतराळात पसरावी. भारतभूमी पुन्हा एकदा मानवतावादी व आदर्शवत व्हावी.

**भाषिक वैशिष्ट्ये :** मुक्तछंदात (मुक्तशैलीत) लिहिलेली ही कविता आवाहनात्मक झाली आहे. कवितेची भाषा साधी व थेट काळजाला भिडणारी आहे. या ओळींमध्ये 'ओज' हा गुण आढळतो. ही शब्दकळा उत्साहवर्धक, विश्वास जागृत करणारी आहे. मूल्यहीन विचारांचा त्याग करणारी नवमानवतावादी प्रेरणा या ओळींतून मिळते.

## व्याकरण व भाषाभ्यास

**कृतिपत्रिकेतील प्रश्न ४ (अ) आणि (आ) यांसाठी...**

### अ व्याकरण घटकांवर आधारित कृती :

**• समास :**

**• पुढील सामासिक शब्दांचे समास ओळखा :**

(i) भेदाभेद (ii) यथाशक्ती (iii) युवकयुवती (iv) पाऊसपाणी.

**उत्तरे :**

(i) भेदाभेद – वैकल्पिक द्वंद्व (ii) यथाशक्ती – अव्ययीभाव
(iii) युवकयुवती – इतरेतर द्वंद्व (iv) पाऊसपाणी – समाहार द्वंद्व.

### आ भाषिक घटकांवर आधारित कृती :

**१. शब्दसंपत्ती :**

**(१) गटात न बसणारा शब्द लिहा :**

(i) आकाश, गगन, सदन, नभ, अंबर.
(ii) रसा, वसा, भूमी, पृथ्वी, धरणी.

**उत्तरे :** (i) सदन (ii) वसा.

**(२) लिंग ओळखा :**

(i) तहान (ii) भूक (iii) स्नायू (iv) वीज.

**उत्तरे :** (i) तहान – स्त्रीलिंग (ii) भूक – स्त्रीलिंग
(iii) स्नायू – पुल्लिंग (iv) वीज – स्त्रीलिंग.

**(३) पुढील शब्दांतील अक्षरांपासून प्रत्येकी दोन अर्थपूर्ण शब्द लिहा :**

(i) चाहूल (ii) मातीत (iii) पावसाच्या (iv) एकवार.

**उत्तरे :**

(i) चाहूल → चाल, हूल. (iii) पावसाच्या → वसा, पाव.
(ii) मातीत → माती, मात. (iv) एकवार → एक, वार.

**(४) पुढील वाक्यातील अव्यये व प्रकार ओळखा :**

पुन्हा एकदा वीज चमकावी.

**उत्तरे :** (i) पुन्हा – क्रियाविशेषण अव्यय.
(ii) एकदा – क्रियाविशेषण अव्यय.

**२. लेखननियमांनुसार लेखन :**

**• पुढील शब्द शुद्ध स्वरूपात लिहा :**

(i) भूमि (ii) ओजस्वि (iii) परिक्शा (iv) वैशीष्ठ्य.

**उत्तरे :** (i) भूमी (ii) ओजस्वी (iii) परीक्षा (iv) वैशिष्ट्य.

**३. भाषिक खेळ/अकारविल्हे :**

**• 'जगमय' सारखे चार शब्द लिहा.**

**उत्तर :** (i) प्रेममय (ii) कारुण्यमय (iii) सुखमय (iv) रसमय.

**नोंद :** या पाठाअखेरीस पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ४४ वर देण्यात आलेले 'अपठित गद्य आकलन' या नवनीतच्या अखेरीस पृ.क्र. १४९ वर पाहा.